दै. सकाळ दि. 16-10-24

# चोरीच्या १४ दुचाकी जप्त; तिघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई : सहा लाखांचा मुद्देमाल जप्त, १४ ठिकाणी केली चोरी



नांदेड : स्थानिक गुन्हे शाखेने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना ताब्यात घेऊन ६ लाख ४० हजार रुपये किमतीच्या १४ मोटारसायकली जप्त केल्या.

**नांदेड, ता. १५** : स्थानिक गुन्हे शाखेने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यातील तीन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून ६ लाख ४० हजार रुपये किमतीच्या १४ मोटारसायकल जप्त केल्या. म्हाळसाकांत ऊर्फ गगन मारोती उराडे (२४), निजाम नूरशाह फकीर (२४), स्वराज ऊर्फ माधव एकनाथ मोरे (२६) अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत.

पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेला जिल्हा परिषद प्रांगणातील पडक्या जागेत पाठविले. पोलिस पथकाने तेथून वरील तिघांना ताब्यात घेतले. या तिघांकडून कागदपत्र नसलेल्या चोरीच्या १४ दुचाकी सापडल्या. स्थागुशाचे पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड यांच्या तक्रारीनुसार तिघांवर वजिराबाद ठाण्यात गुन्हा दाखल केला.

पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार, अपर पोलिस अधीक्षक डॉ. खंडेराय धरणे, सूरज गुरव आदींनी या कार्यवाहीसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक उदय खंडेराय, सायबरचे पोलिस निरीक्षक धीरज चव्हाण, पोलिस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोलिस अंमलदार बालाजी तेलंग, किशन मुळे, विलास कदम, संतोष बेल्लुरोड, तिरुपती तेलंग, संदीप घोगरे, बालाजी कदम, राजू डोंगरे, अमोल घेवारे, सुधाकर देवकते आणि सायबर विभागातील राजेंद्र सिटीकर आणि व्यंकटेश सांगळे यांचे कौतुक केले आहे.

### १२ गुन्हे उघडकीस

वेगवेगळ्या १४ ठिकाणांवरून त्यांनी या दुचाकी चोरल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. त्यात उदगीर १, पुणे-१, नांदेड शहरातील विविध ठिकाणी-१२ अशा १४ दुचाकी त्यांनी चोरल्या होत्या. त्यांच्याकडे सापडलेल्या दुचाकींमुळे वजिराबाद ठाण्यातील दुचाकी चोरीचे सहा गुन्हे, भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तीन गुन्हे, नांदेड ग्रामीण हद्दीतील दोन गुन्हे, लातूर जिल्ह्यातील उदगीर ठाण्याच्या हद्दीत घडलेला एक दुचाकी चोरीचा गुन्हा उघडकीस आला आहे.

दै. लोकमत दि. 16-10-24

# चोरीची वाहने जिल्हा परिषदेत लपविली



लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड** : नांदेडसह शेजारील जिल्ह्यात अनेक ठिकाणी दुचाकींची चोरी केल्यानंतर त्या जिल्हा परिषदेच्या पाठीमागे असलेल्या पडीक जागेवर आणून लपविण्यात आल्या होत्या. याबाबत माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने १४ दुचाकी जप्त केल्या असून, या प्रकरणात तिघांना पकडण्यात आले आहे.

जिल्ह्यात दररोज दुचाकी चोरीच्या घटना घडत आहेत. त्यातील मोजकेच दुचाकी चोरटे पोलिसांच्या हाती लागतात. त्यातच स्थानिक गुन्हे शाखेला दुचाकी चोरट्यांच्या टोळीची माहिती मिळाली होती. त्यावरून म्हाळसाकांत उर्फ गगन मारोती उराडे रा. कोटतीर्थ, निजाम नूरशहा फकीर रा. उस्माननगर आणि स्वराज उर्फ माधव एकनाथ मोरे या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता, त्यांनी नांदेड शहरातून वेगवेगळ्या ठिकाणांहून १२, उदगीर १ आणि पुणे येथून चोरी केलेली १ दुचाकी अशा एकूण १४ दुचाकी जिल्हा परिषदेच्या पाठीमागे असलेल्या पडीक जागेवर ठेवल्याची माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी या सर्व दुचाकी जप्त केल्या आहेत.

आरोपींकडून वजिराबाद ६, भाग्यनगर ३, नांदेड ग्रामीण २ आणि उदगीर येथील एक गुन्हा उघडकीस आला. या प्रकरणात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.